RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक १६] शुक्रवार, मार्च ३, २०१७/फाल्गुन १२, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च २०१७

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही. २०१५/प्र.क्र. ६०८/का-१२.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील ' वाहनचालक ' (मोटार कार आणि जीप्स), गट-क या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील ' वाहनचालक ' (मोटार कार आणि जीप्स), गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१७, असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ख) " मोटार वाहन " याचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कलम २ (१७) (२१) आणि (२४) नुसार जड प्रवासी वाहन, हलके मोटार वाहन आणि मध्यम प्रवासी वाहन असा आहे ;

(ग) " मान्यताप्राप्त शाळा " याचा अर्थ शासनाने मान्यता दिलेल्या शाळा, असा आहे.

(घ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

(ड) " निवड समिती " याचा अर्थ वाहनचालक या पदावर नियुक्तीसाठी गठीत केलेली समिती.

३. महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील ' वाहनचालक ' (मोटार कार व जीप) या पदावर पुढीलपैकी कोणत्याही एका मार्गाने नेमणूक करता येईल :—

(अ) ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने ;

(एक) या पदावर पदोन्नतीस इच्छुकता दर्शविलेल्या ;

(दोन) शासकीय कार्यालयातील व अधिपत्याखालील कार्यालयातील गट-ड मधील कोणतेही पद धारण केलेल्या ;

(तीन) सदर पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या ; आणि

(चार) नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी या नियमाच्या खंड (ग) च्या उप खंड (२) (३) (५) (६) (७) व (८) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून ;

किंवा

(ख) खालील अर्हता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या बदलीने,—

(एक) शासकीय कार्यालयातील व अधिपत्याखालील कार्यालयातील वाहनचालक पदाशी समकक्ष असलेल्या गट-क मधील पद धारण करणाऱ्या आणि

(दोन) नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी या नियमाच्या खंड (ग) च्या उप खंड (२) (३) (५) (६) (७) व (८) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीमधून ;

किंवा

(ग) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने :—

(एक) ज्यांचे वय ३८ वर्षांपेक्षा जास्त नाही ;

(दोन) ज्यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केला आहे ;

(तीन) ज्यांनी शासन मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे ;

(चार) ज्यांनी शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केला आहे ;

(पाच) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक ;

(सहा) ज्यांचा वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व ज्यांचेकडे चांगली शारीरिक क्षमता आहे ;

**टीप.**—" वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख " यामध्ये खालील बाबी येतात :—

(१) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करून वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिद्ध झालेला नसावा.

(२) वाहनचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

(सात) ज्यांना संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती आहे ; आणि

(आठ) ज्यांना मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे :

परंतु सदर पदावरील नियुक्तीसाठी खंड (ग) च्या उप खंड (चार) नुसार विहित केलेल्या कालावधीचा अनुभव धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, निवड समितीच्या शिफारशीनुसार अनुभव कालावधी १ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने नियुक्तीच्या वेळी वाहन चालविण्याची चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण ५० : ५० असे राहील :

परंतु, सेवेच्या गरजेनुसार, नियुक्ती प्राधिकाऱ्यांस पदोन्नती व नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेले प्रमाण शिथिल करता येईल.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त होणारी व्यक्ती शारीरिकदृष्ट्या पात्र असावी तसेच दृष्टीने चांगली असणे आवश्यक राहील. तो रातआंधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा. त्याने नियुक्तीपूर्वी शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे व दृष्टी चांगली असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित कार्यालयाने ठरविल्यानुसार जिल्हा, मंडळ, विभाग किंवा अन्य स्तरावर बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मुकेश खुल्लर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.